# राष्ट्रीय आरोग्य अभियान जाहिरात सन २०२३-२४
## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी रत्नागिरी

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंबकल्याण सोसायटी रत्नागिरी यांचेतर्फे उमेदवारांकडुन निव्वळ करार तत्वावर खालील पदांसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज टपालाने किंवा प्रत्यक्ष तालुका आरोग्य कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जयस्तंभ,रत्नागिरी या कार्यालयाकडे सादर करावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण | पात्रता | अनुभव | रिक्त पदांची संख्या | आरक्षणानुसार भरावयाची पदसंख्या | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ANM | NUHM Ratnagiri | ANM | Min. 1 Year Experience | 2 | ST-1, NTC-1 | १८००० /- |
| 2 | Pharmacist | NUHM Ratnagiri | B.Pharm/ D.Pharm | Min. 1 Year Experience | 1 | SC-1 | १७००० /- |
| | Total | | | | 3 | | |

पदभरती विषयक पुढील सर्व सुचना जिल्हयाच्या संकेतस्थळावर https://ratnagiri.gov.in & https://zpratnagiri.gov.in प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

सुचना:

१) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) निवड झालेल्या उमेदवाराला ११ महिन्यांकरिता कंत्राटी पद्धतीने नेमणूक देण्यात येईल.

३) निवड झालेल्या उमेदवारांना समितीने तयार केलेल्या अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील तसेच रु.१००/- च्या बॉण्डपेपरवर करारनामा सादर करावा लागेल.

४) अनुभवा संबंधी प्रमाणपत्र जोडले नसल्यास अनुभव ग्राहय धरला जाणार नाही. (शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल, शैक्षणिक अर्हता धारण करण्यापुर्वीची अनुभवाची नोंद करण्यात येवू नये.) ज्यापदाकरीता अर्ज केला आहे त्यापदाकरीता आवश्यक असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल. याव्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

५) **वयोमर्यादा** - १) एमबीबीएस, विशेषतज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषतज्ञ या पदाची कमाल वयोमर्यादा ७० वर्षे २) वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्स, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषधनिर्माता या पदाची कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे ३) इतर पदे खुल्या प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे व राष्ट्रीय आरोग्य अधिकारी अंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी ५ वर्षे शिथिल

६) ६० वर्षावरील अर्जदारास जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

७) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरिता आरोग्य सेविका, औषधनिर्माता, वैदयकीय अधिकारी ई. पदांकरिता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

८) मा.सहसंचालक (अतांत्रिकी), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे क्र.राआसो/मनुष्यबळ/आरक्षण/२४५४६-७७४/२०१६, दिनांक २०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार, आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

९) सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१०) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी रत्नागिरीच्या एनआयसीच्या व जिल्हा परिषद च्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत येईल .

११) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

१२) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

१३) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकारी मा.जिल्हाधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१४) सुपरस्पेशालिस्ट व स्पेशालिस्ट, वैदयकीय अधिकारी, वैदयकीय अधिकारी एमबीबीएस पदाकरिता अर्ज प्राप्त न झाल्यास, पद भरेपर्यंत प्रत्येक महिन्याच्या दर गुरुवारी थेट मुलाखतीद्वारे मसिक मानधन तत्तवावर अथवा ऑन कॉल/पार्ट टाईम बेसिस वर पदभरती करण्यात येईल.

१५) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दि.०१.०७.२००५ च्या शासन निर्णयानुसार लहान कुटुंबाची अट लागु करणेत आली असुन, अर्जाच्या नमुन्यासोबत जोडण्यात आलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती –**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची मार्कशिट व प्रमाणपत्रे (सेमिस्टर पॅटर्न असणाऱ्या उमेदवाराने अर्जावरती मार्क्स नमुद करताना सरासरी गुण नमुद करावे.)

२) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला/आधार कार्ड

३) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र

४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (अदयावत नुतनीकरण)

५) जात प्रमाणपत्रची सांक्षाकिंत प्रत

**अर्ज करण्याची पध्दत :**

१) इच्छुक उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्याता ए ४ आकाराच्या पांढ्या जाड कागदावर एका बाजुस टंकलिखीत अथवा मुद्रीत करुन सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज सादर करावा.

२) लिफाफयावर पदाचे नांव व युनिटचे/कक्षाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

३) एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज शुल्कासह सादर करावेत.

४) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- अर्ज शुल्क भरणे आवश्यक आहे. अर्ज शुल्क हे ऑनलाईन पध्दतीने (फोन पे/जीपे/युपीआय/इंटरनेट बॅकिंग/मोबाईल बॅकिंग) ने खाते क्रमांक **034001003621** आयसीआयसीआय बॅक,रत्नागिरी **RATNAGIRI THO NUHM** आयएफएससी कोड **ICIC0000340** मध्ये भरणा करुन त्याचा **UTI/UTR Transaction No.** अर्जामध्ये स्पष्ट नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्यक्ष अर्जासोबत ऑनलाईन भरणा केलेल्या रक्कमेची पावती जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा अर्ज अपात्र करण्यात येईल. तसेच ज्या उमेद्वारांना ऑनलाईन शुल्क भरणा करणे शक्य होणार नाही त्यानी **RATNAGIRI THO NUHM** या नावाने डि.डि.काढून शुल्क भरणा करावे. डि.डि. **Payable at Ratnagiri** असणे आवश्यक आहे. डिडिच्या मागे स्वतःचे नाव व पदाचं नाव लिहून मुळ डि.डि.अर्जासोबत सादर करण्यात यावा.

५) उमेदवारांनी **दि२६/०७/२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेच्या आत सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज आवश्यक गुणपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह तालुका आरोग्य कार्यालय, रत्नागिरी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष किंवा टपालाने पोहोच करणे गरजेचे आहे.

**खालील उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील :**

१) विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

२) विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज.

३) मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज.

४) स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले अर्ज.

६) अर्ज शुल्क न भरणा केल्यास, मुळ डि.डि. व योग्य रक्कमेचा डि.डि. न सादर केल्यास.

७) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र न जोडलेले अर्ज.

वरीलप्रमाणे कोणत्याही बाबतीत त्रुटी असल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल व त्याबाबतीत आपल्याशी कोणताही पत्रव्यवहार केला/स्विकारला जाणार नाही.

<u>टिप</u> : उपरोक्त पदसंख्येत बदल करणे तसेच पदस्थापनेच्या ठिकाणा व मानधनामध्ये बदल करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.

डॉ.राजन बी शेळके
तालुका आरोग्य अधिकारी
तालुका कार्यालय, रत्नागिरी
तथा सदस्य सचिव
नगरपालिका स्तरीय पदभरती समिती
रत्नागिरी

श्री.किर्तीकिरण पुजार
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.रत्नागिरी
तथा अध्यक्ष
नगरपालिका स्तरीय पदभरती समिती
रत्नागिरी

# राष्ट्रीय आरोग्य अभियान पदभरती सन २०२३-२४

## अर्जाचा नमुना

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजचा फोटो लावावा व त्यावर स्वतःची स्वाक्षरी करावी. |

प्रति,

मा.तालुका आरोग्य अधिकारी

तालुका आरोग्य कार्यालय,

रत्नागिरी - ४१५ ६१२.

विषय - ..............................पदाकरिता अर्ज.

१) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :- ................................................

२) संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) : - ............................................
.................................................
.................................................
..................................................

दूरध्वनी क्रमांक :- ................................................

ईमेल आयडी :-

३) जन्मतारीख :-

| तारीख | महिना | वर्षे |
|---|---|---|
| | | |

४) अर्ज करतेवेळीचे वय :-

| वर्षे | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

५) जात व प्रवर्ग :-

जातीचा दाखला/जात प्रमाणपत्र पडताळणी दाखला

६) कोणत्या प्रवर्गातुन अर्ज दाखल केला आहे :-

७) ऑनलाईन पेमेंट UTR/UPI No. व दिनांक :-

रक्कम :-

८) शैक्षणिक अर्हता :

| अ. क्र. | अर्जदाराची शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण झालेल्या परीक्षांचा तपशिल | विदयालयाचे/परीक्षा मंडळाचे नाव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | घेतलेले भाषा विषय | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९) अनुभवाचा तपशिल :

| संस्था | पद | पासून | पर्यंत | एकुण वर्ष/महिने | कमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती

१) ............................................ २) .......................................

३)............................................ ४).......................................

**प्रतिज्ञापत्र**

प्रमाणित करतो/करते की, अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे, ती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळुन आल्यास मला सेवेत अपात्र समजुन माझ्यावर कारवाई केल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही.

स्थळ :
दिनांक :

उमेदवाराची सही

## प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................

श्री.........................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.........................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-